## नियमीत दिवाणी दावा क्र.७९१/२०२४ मधील निशाणी क्र.११ वरील आदेश

( CNR : MHAH250020952024 )

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळणेकामी दाखल केला आहे. सदर अर्जाचे पुष्ठ्यर्थ प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे.

२. सदर प्रतिवादींचे असे कथन आहे की, सदर प्रतिवादी यांना रेमुनं.४२२/२०२४ ची कागदपत्रे तसेच महसुल खात्याकडील ७/१२ उतारे व फेरफार नोंदीचे उतारे वेळेत उपलब्ध न झाल्याने वेळेवर कैफीयत दाखल करता आली नाही. प्रतिवादी यांना त्यांचे म्हणणे देणे आवश्यक आहे अन्यथा त्यांचे अतोनात नुकसान होईल. सबब प्रस्तुत अर्जाद्वारे सदर प्रतिवादींना त्यांना दाव्याचे कामी कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ होऊन कैफियत दाखल करुन घेण्यास विनंती केली आहे.

३. वादींनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे देऊन विरोध दर्शवला आहे. वादींनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी हे मुद्दाम दावा चालवण्यास उशीर करीत आहेत. त्यामुळे हेवी कॉस्ट करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व सदर प्रतिवादी यांचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

५. वादींनी सदरचा दावा प्रतिवादींच्या विरोधात जाहीर ठराव व निरंतर मनाईसाठी दाखल केलेला आहे. दाव्यातील कथनाचे अवलोकन करता असे दिसून येते की, सदर दाव्यामध्ये पक्षकारांचे शेतजमीनींमधील मौल्यवान अधिकार समाविष्ट आहेत. सदर प्रतिवादींनी मुदतीत कैफियत देऊ न शकल्याचे कारण संयुक्तीक वाटते. सदर प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जासोबत कैफियत दाखल केलेली आहे. सदर प्रतिवादींची कैफियत दाखल करुन न घेतल्यास त्यांचे अतोनात नुकसान होईल. तसेच प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही, उलट दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्यास मदत होणार आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना समन्सची बजावणी होवुन ते दि.१८.११.२०२४ रोजी वकीलामार्फत हजर होवुन प्रस्तुत अर्ज आजरोजी दाखल

केला आहे. सबब, अर्जातील कथनांचा विचार करता नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

१. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादी यांना खर्च रक्कम रु.२००/- देण्याच्या अटीवर अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी खर्चाची रक्कम वादीस दिल्यावर त्यांची कैफीयत स्विकारण्यात यावी.

SHITAL CHANDRAKIRAN SALVI
Digitally signed by SHITAL CHANDRAKIRAN SALVI
Date: 2025.01.14 11:06:46 +0530

**( एस. सी. साळवी )**

**दि. १३.१.२०२५** **सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**

**पारनेर** **पारनेर**